(35) तृतीय क्रमांक : श्रीम. सिमा प्रधान (उ.५)



## सुसंवाद .... काळाची गरज

परवा एका नाटकातले वाक्य आठवले. "का? बोलायचं असा प्रश्न विचारला जातो तेव्हा समजावं माणसातला संवाद संपत आलाय. पण ही खरी गोष्ट आहे. आज माणसांमाणसांमध्ये संवाद असा राहीलाच नाही, त्यातूनही सुसंवाद तर नाही.

पूर्वीच्या काळी एकत्र कुटुंब पध्दती असल्याने घरात माणसांच्या राबता आपोआपच असायचा. आई वडिल आजी आजोबा बहिण भाऊ ही घरातली माणसं एकत्र रहात असल्याने एकमेकांशी छान गप्पा, कधी कधी हास्यविनोद होत असत. शिवाय घरात येणारे काका काकी, मामा मावश्या ह्यांच्यामुळे घरात आनंदी वातावरण असे. एकमेकांच्या सुखदुःखाच्या गोष्टी होत. शिवाय सणासुदीला येणाऱ्या पाहुण्यांमुळे घर आनंदाने भरुन जात असे. एकमेकांशी छान असा सुसंवाद साधला जात असे. पण आता परिस्थिती बदलली आहे.

विभक्त कुटुंब पध्दती आली. आई वडिल आणि मुले घरात. आई वडिल नोकरीला जाणारे. मुले शाळा कॉलेज मधून घरी आली कि एक एकटी. मग संवाद कुठून होणार एकमेकांशी. मुले त्यांचा अभ्यास, क्लासेस मध्ये व्यस्त आणि आई वडिल त्यांचे ऑफीस आणि मग घरातली कामं ह्यात व्यस्त. ह्यामध्ये मुलांचा सर्वात मोठा सोबती त्यांचा मोबाईल. ह्या मोबाईल मध्ये त्यांचं अख्खं जग सामावलेलं असतं. चांगलं आणि वाईट दोन्ही. चांगलं ह्या साठी कि काळाच्या गरजेप्रमाणे सर्व प्रकारचं online training त्यांना ह्यामधून मिळतं. Tablet, computer द्वारा online अभ्यास, क्लासेस सर्व सुविधा मिळतात. जास्तीत जास्त वेळ त्यांचा screen समोरच जातो. आणि मग विरंगुळ्या साठी आहेतच social media. ज्या द्वारे ही मुले एकमेकांच्या संपर्कात असतात. तसेच हानीकारक Games, Pictures त्यांच्या डोळ्यासमोरुन जातच असतात. आणि मग परिस्थिती हाता बाहेर गेल्यावर सुधारणा आणणं कठीण जातं. कारण ही मुले आई वडिलांशी संवादच टाळतात. ती त्यांच्या विश्वातच असतात. ह्या सगळ्या आधुनिक उपकरणांचा जेव्हा आपण आपल्या फायद्यासाठी, विकासासाठी उपयोग करतो तेव्हा आपलं आयुष्य चांगल्या रितीने मार्गी लागतं. पण तेच त्यांचा अतिरेक केला, तर आयुष्य

करत बिघडत, हयाची चर्चा किंवा संवाद घरामध्ये व्हायला हवा. उगाच आरडा ओरड न करता एकमेकांना समजून घेतले तर घरात चांगला संवाद होतो. मुलांनीही आई-वडिलां-बरोबर मोकळे पणाने आपले Problems, आपल्याला येणारे ताणतणाव किंवा कोणी त्यांना त्रास देत असेल ह्या सगळ्या गोष्टी मोकळे पणाने बोलले तर, आणि आई वडिलांनी ही मुलांना समजून घेतले तर घरात चांगला सुसंवाद होतो. चांगल्या संवादाद्वारे एकमेकांच्या समस्या सोडविण्यास मदत होते. आणि तरचा सुसंवाद घडावा, कारण आपण हल्ली बघ्यातच ऐकतो कि मुलं टोकाची पावलं उचलतात ती कोणत्या तरी मानसिक तणावाखाली असतात, कि ज्यामधून त्यांची सुटका नसते. आणि ह्या गोष्टी आई वडिलांपर्यंत पोहोचल्याच नाहीत तर मार्ग कसा निघणार, त्यासाठी घरामध्ये पोषक व खेळी-मेळीचे वातावरण असावे, ज्या योगे एकमेकांशी व्यवस्थीत संवाद होऊ शकेल.

जी गोष्ट मुलांची, तीच मोठ्या माणसांची. नोकरीच्या निमित्ताने घराबाहेर पडणारे स्त्रीपुरुष, त्यांच आयुष्य तर सतत धावण्यात जातं, सकाळी धावत ट्रेन पकडण्यापासून ते रात्री घरी येईपर्यंत. आणि हल्ली कामाचा ताण-तणाव इतका असतो, कि त्यांना सतत कोणतं तरी Target पूर्ण करायचं असत. ऑफिसमध्ये लोक कामा निमित्त बोलतात, पण सुसंवाद नसतो, कारण कोणतं तरी काम पूर्ण करण्याची घाई असते. नवरा बायको कामावरुन घरी आले कि नवऱ्याला स्वतःचा निवांत वेळ मिळतो. परंतु बायकोला स्वयंपाक घरात उभं रहावं लागतं, अश्या वेळी नवऱ्याने बायकोची थोडी चवकशी केली किंवा तिला थोडा वेळ दिला तर, किंवा कामात मदत केली तर, त्या स्त्रीला किती बरं वाटेल. पण तसं घडत नाही. काही ठिकाणी अपवाद असतात. आणि हल्ली तर काय झालय, नवरा बायको दोघही उच्चशिक्षित आणि उच्चपदावर काम करणारे असतात. ते आपापलं Carrier व्यवस्थीत सांभाळतात पण त्यांची खूप ओढाताण होते आणि मग खूप चिडचिड होते. त्यात प्रत्येकाची एक अहम भावना असते. त्यामुळे एकमेकांचे वाद होत रहातात. पण दोघांनीही एकमेकांना थोडा वेळ दिला, एकमेकांना

समजून घेतले तर गैरसमज पसरणार नाहीत. हल्ली घटस्फोटांचे प्रमाण ही खूप वाढले आहे. कारण बारीक सारीक गोष्टी वरून वाद उकरून काढून भांडणाचा विपर्यास होतो. प्रत्येकाला आपली बाजू खरी वाटते, आणि मग ते विभक्त होतात. त्याचा परिणाम संपूर्ण कुटुंबावर होतो. मुलांचे ही भवितव्य बिघडले जाते.

आयुष्याच्या धकाधकीतून बाहेर पडल्यानंतर, म्हणजे नोकरी, व्यवसायातून निवृत्ती घेतल्यानंतर आपल्या घरच्या जबाबदाऱ्या पार पाडल्यानंतर माणसं जेव्हा घरात बसतात तेव्हा त्यांना एकाकीपणा जाणवतो. कारण बोलायला घरात कोणी नसतं आणि जो तो आपल्या व्यवसायात मग्न असतो. त्यामुळे त्यांचा कोणाशी संवाद नसतो. ह्या एकटेपणाचा म्हणजे घरात दोघही नवरा बायको असले तरीही त्रास होतोच. तसेही वयस्कर माणसांना तरुणांशी काय आणि किती बोलायचे हा प्रश्नच असतो. कारण पुढच्या पिढीचे विचार आणि वयस्करांचे विचार यात तफावत असते. त्यामुळे त्यांचा सर्वसाधारण संवाद होतो, पण विचारांची देवाण घेवाण होत नाही. करण एकमेकांना एकमेकांचे विचार पटत नाहीत.
पण तेच जर दोन्ही पिढ्यामध्ये व्यवस्थित समन्वय असेल त्यांना एकमेकांना, एकमेकांचा आधार वाटेल. ह्या सगळ्या समस्या झाल्या प्रत्येक पिढीमधल्या ज्यांच्या एकमेकांशी संपर्क, संवाद कमी असतो. त्यात आता Social media ची भर पडलीय, म्हणजे कोणाशीच बोलायला नको. अगदी लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत सगळे जण whatsapp किंवा Facebook च्या माध्यमातून एकमेकांशी संपर्कात असतात. पण संवाद नसतो. सगळे जण screen समोर असतात. वाढदिवस असो, लग्नाचा वाढदिवस असो, परिक्षेतील यश असो किंवा काही आप्रिय घटना असो. w.app केले किंवा मेसेज केला कि झाले विषय संपतो. पण तेच जर फोन करून समोरच्या व्यक्तीचे अभिनंदन किंवा विचार -पूस केली तर, त्या व्यक्तीला नक्कीच आनंद होईल. कारण आपली कोणीतरी दखल घेतोय याचा आनंद नक्कीच असतो. अर्थात ह्या मध्ये सुद्धा काही अपवाद असतात काही जणांना एकमेकांशी खूप संपर्कात

असाव असं वाटतं, तो एकमेकांशी चांगल्या रितीने संबंध ठेवून आपल्यातली नाती चांगल्या रितीने निभावतात आणि त्याचा त्यांच्या जीवनावर चांगला परिणाम होतो.

मानवाच्या उत्क्रांती चा इतिहास पाहीला तर काय दिसतं, माणूस हा कळपात रहाणारा प्राणी आहे. कळपात राहून तो वन्यप्राण्यांपासून किंवा कोणत्या -ही नैसर्गिक आपत्तीपासून आपला बचाव करतात जसजशी प्रगती होत गेली, समाज रचना तयार झाली त्यात अनेक बदल होते, आणि होत आहेत. अनेक प्रकारचे शोध लागले.

आता माणसांना कळपात रहाण्याची गरज भासत नाही. विविध प्रकारच्या सुविधा आल्यामुळे आल्यानंतर त्याला स्वतंत्र रहाण्याची आवड निर्माण झाली. प्रत्येक माणूस म्हणजे स्वतंत्र बेट निर्माण झालय. तो त्या स्वतःच्याच विश्वासात रमतो. आपल्या आवडी निवडी जपणे, आपले career ह्यातच तो मग्न असतो. पण कधीतरी काय होतं कि हा एकटेपणा माणसांना त्रास द्यायला सुरुवात करतो. एकटेपणाने माणसांना नैराश्य येतं. अगदी लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत हि नैराश्याची समस्या संपूर्ण जगात पसरली आहे. आणि त्यामुळे मनोरुग्णांची संख्या वाढते आहे. ह्या नैराश्यामध्ये माणसांच्या मेंदूतील जी आनंदाची रसायने आहेत जसे कि Oxytocine, Dopamine, Serotonine ह्यांची पातळी खाली जाते, कमी होते. त्यामुळे माणसाला आनंद होत नाही, आणि तो कुठे शोधावा समजत नाही. त्यासाठी माणसाला प्रवाहात येणं जरुरी आहे. नैराश्याच्या गर्तेत गेलेल्या माणसांना औषधोपचारा बरोबर आपल्या आवडत्या व्यक्तींसोबत किंवा मित्रमैत्रीणी बरोबर मिसळून जर व्यवहार ठेवला चांगला संवाद केला, तर त्याच्यात नक्कीच चांगला बदल घडून येईल.

तसं पाहीले तर आपल्याकडे लोकांना समाज माध्यमांवरून बोलण्याचा किंवा आपले विचार मांडण्याचा पूर्ण हक्क आहे. आपले विचार लोकांपर्यंत पोचावेत हा हेतू असतो, परंतु ते विचार चांगल्या रितीने मांडलेले असावेत, किंवा कोणतीही

वक्तव्य भडक नसावीत, जेणे करून समाजात तेढ निर्माण होईल. आपले विचार शांतपणे समंजस जर व्यक्त केले तर त्यातून काही तरी मार्ग निघतो. माझेच म्हणणे खरे अशी प्रवृत्ती नसावी. समोरच्यांचा ही विचार करून संवाद साधला तर त्यातून मार्ग निघतो. व्यवस्थित चर्चा (चर्चा) होते. सुसंवाद निर्माण होतो. पण हल्ली तसं घडत नाही. अगदी राजकीय पक्षांचच उदाहरण घ्या ना. ह्या राजकीय मंचावर तर सर्व नेते मंडळी एकमेकां-विरुद्ध अशा आरोळ्या ठोकत असतात, त्यामुळे असा काही गदारोळ निर्माण होतो कि लोकांना टि.व्ही पहाताना किंवा वर्तमानपत्रातल्या बातम्या वाचताना लोकांच्या मनात असा संभ्रम निर्माण होतो कि आपण कोणत्या काळात वावरतो आहोत? वाटतं कि संस्कार सुसंस्कृत पणा सामंजस्य, भौतीकच्या उच्च विचार सरणी ह्याला काही थारंच नाही का? जे डोळ्यासमोर दिसतं नकोच जर वर्तणूक माणसामध्ये आली तर पुढच्या पिढीसाठी आपण काय आदर्श निर्माण करणार आहोत?

वाईट गोष्टी पटकन आत्मसात केल्या जातात. चांगल्या गोष्टी आत्मसात करण्यासाठी काही काळ जावा लागतो. त्यासाठी चांगल्या गोष्टींचा आदर्श आणि चांगला सुसंवाद असावाच लागतो.

आज संपूर्ण जगात एक प्रकारची अस्वस्थता निर्माण झाली आहे. त्यामध्ये दोन मुख्य प्रश्न आहेत. एक तर युध्दजन्य परिस्थिती आणि दुसरं जागतिक पर्यावरण. दोन्ही माणसांमुळे बिघडलं आहे. माणसामधला अहम, अती लोभ, वसाहतवाद, दुसऱ्यांवर ताबा मिळवणे, आपलंच तेच खरं, संहारक वृत्ती, दहशतवादी पणा ह्या गोष्टी अती टोकाला गेल्या आहेत. त्यामुळे आपण आपले संरक्षण कसं करावं हाच प्रश्न आहे. त्यामुळे देशा देशामधून युध्दजन्य परिस्थिती निर्माण होते. नुसत्या शस्त्रांमुळे प्रश्न सोडविले जात नाहीत. जगात शांतता हवी असेल तर एकमेकां बरोबर बसून शांतपणे समंजस पणे चर्चा घडवून आणली तर निश्चितच त्याचा चांगला परिणाम दिसून येतो. निदान युध्द आणि संहार तरी टळता येतील.

दुसरा प्रश्न आहे पर्यावरणाचा. संपूर्ण जगात हा परिणाम किंवा प्रश्न गंभीर होत चालला आहे. कारण त्याचे वाईट परिणाम सर्वच देशाना भोगावे लागणार आहेत.

वातावरणाचा समतोल बिघडल्यानंतर ज्या काही नैसर्गिक आपत्ती येतील त्याला तोंड देण्याची तयारी प्रत्येक देशाला करावी लागणार आहे. खर तर त्या आधीच या विषयावर चर्चा, आणि त्या अनुषंगाने प्रयत्न केले तरच पर्यावरणाचा समतोल राखला जाईल. म्हणजेच येथे एक प्रकारचा सुसंवाद होणे जरुरी आहे, कारण बिघडलेल्या पर्यावरणाचे काय परिणाम होणार आहेत याचा शास्त्रज्ञांनी केव्हाच इशारा दिला आहे, आणि त्याचे वाईट परिणाम कित्येक वर्षांपासून आपण बघतोच आहोत. वाढत्या घटनांना आपण मानवच जबाबदार असतो. म्हणूनच परिस्थिती सुधारण्याची जबाबदारी आपलीच असते. मग ती व्यक्तीगत पातळीवर असो, कौटुंबिक असो, सामाजिक राष्ट्रीय कोणतीही असो चांगल्या चर्चेद्वारे आणि त्या योगे चांगले अनुकरण केल्याने हे सर्व साधता येईल, आणि बरेचसे प्रश्न आपण सोडवू शकू.

शेवटी सुसंवाद म्हणजे तरी काय एकमेकांशी नीट बोलणे ह्या सर्व सवयी लहानपणापासून लावल्या तर मोठेपणी ही माणसं समंजस होतील. हा समंजसपणाच बऱ्याच गोष्टी सांभाळून घेतो. कोणत्याही गोष्टी टोकापर्यंत न नेणे केव्हाही उचित असते. भांडणाचा विपर्यास शेवटी हिंसेपर्यंत जातो. शाब्दिक हिंसा, शारिरीक हिंसा वगैरेपर्यंत जाते. हे सर्व टाळण्या-साठी प्रत्येकाने सतर्क राहीले पाहीजे. खर तर माणसांना एकमेकांची गरज लागतेच. कितीही ठरवले आपण एकटे राहू शकू, तरी आपला स्वतःचा कळप म्हणजेच आपला समूह समाज याची गरज लागतेच. परंतू समाज सशक्त समंजस आणि सुशिक्षित असला पाहीजे. एकमेकांना धरुन रहाणारा असला पाहीजे. चांगल्या रितीने संवाद साधून असला पाहीजे. तरच तो समाज सुसंस्कृत होतो. आपल्या संतांची शिकवण ही आहे ना एकमेकां करु सहाय्य अवघे धरु सुपंथ. तेव्हा सुसंवाद ही आजच्या काळाची अतिशय महत्वाची गरज आहे.

* * *